हिंगोली.
दिनांक :– २४.०५.२०२०

## प्रेसनोट

**लोकसेवक नंदकिशोर उत्तमराव मस्के, पोलीस नाईक, ब.न. ५५९, पोलीस स्टेशन हिंगोली ग्रामीण हिंगोली यांनी १०,०००/–रू. ची लाच स्विकारल्यावरून त्यांना ताब्यात घेतले बाबत..**

---

पिडीत तक्रारदार यांनी दिनांक १६.०५.२०२० रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो हिंगोली येथे तक्रार दिली होती की, त्यांनी पोलीस स्टेशन हिंगोली ग्रामीण येथे दिनांक १०.०५.२०२० रोजी दिलेल्या तक्रार अर्जावरून गै.अ. यांचे विरूध्द कायदेशीरक कार्यवाही करण्यासाठी व गैर अर्जदार यांनी त्यांचे जागेत केलेले अतिक्रमण काढून देण्यासाठी बीट जमादार नंदकिशोर उत्तमराव मस्के हे त्यांचेकडे २५,०००/–रू. ची लोचेची मागणी करीत आहेत.

तक्रारदाराचे तक्रारीवरून दिनांक १६.०५.२०२० रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक नंदकिशोर मस्के, पोलीस नाईक, ब.नं. ५५९, पोलीस स्टेशन हिंगोली ग्रामीण यांनी तक्रारदार यांचे जागेवरील अतिक्रमण पोलीस निरीक्षक सुडके यांचे करवी काढून देण्यासाठी व गै.अ. यांचेविरूध्द कार्यवाही करण्यासाठी पोलीस निरीक्षक सुडके यांचेसाठी २०,०००/–रू. ची व स्वत:साठी ५,०००/–रू.ची अशी एकुण २५,०००/–रू. ची लाचेची मागणी करून लाचेच्या रकमेचा पहिला हप्ता म्हणून १०,०००/–रू. ची तक्रारदार यांचेकडे मागणी केली.

त्यावरून तक्रारदार यांनी सांगितले की, लोकसेवक मस्के बीट जमादार यांनी पोलीस निरीक्षक सुडके यांचेसाठी २०,०००/–रू.ची लाचेची मागणी केली आहे, तरी पोलीस निरीक्षक सुडके यांची लाचेची मागणी आहे काय या बाबत मी त्यांची भेट घेतो.

त्यावरून दिनांक २१.०५.२०२० रोजी पोलीस निरीक्षक सुडके यांची तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी आहे काय या बाबत पडताळणी केली असता पोलीस निरीक्षक सुडके व बीट जमादार मस्के यांचेशी तक्रारदार यांची पोलीस स्टेशन हिंगोली ग्रामीण येथे भेट झाली होती. त्या भेटी दरम्यान बीट जमादार मस्के यांनी तक्रारदार यांना साहेबांना भेटणे बाबत सांगितले होते. तसेच त्या भेटीदरम्यान पोलीस निरीक्षक सुडके यांनी तक्रारदाराचे जागेवरील अतिक्रमण काढून देण्यास व संबंधीतावर केस करण्यास होकार दिला होता. तसेच संध्याकाळी माळहिवरा येथे येवून बोलतो असे तक्रारदारास सांगितले होते. त्यावरून पोलीस निरीक्षक सुडके हे संध्याकाळी माळहिवरा येथे येवून लाचेची मागणी करतात काय या अनुषंगाने माळहिवरा येथे जावून पडताळणी करण्यात आली असता पोलीस निरीक्षक सुडके हे माळहिवरा येथे आले नाहीत. त्यामुळे तक्रारादार यांनी पोलीस निरीक्षक सुडके यांना माळहिवरा येथून मोबाईल फोनवरून फोन लावून बोलणे केले असता त्यांनी तक्रारदार यांना दिनांक २२.०५.२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता पोलीस स्टेशन हिंगोली ग्रामीण येथे येण्याचे सांगितले होते.

त्यानंतर दिनांक २२.०५.२०२० रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान तक्रारदार यांची पोलीस निरीक्षक सुडके यांचेसोबत पोलीस स्टेशन हिंगोली ग्रामीण येथे भेट झाली होती. त्या भेटी दरम्यान पोलीस निरीक्षक सुडके यांनी तक्रारदारास त्याचे जागेवरील अतिक्रमण काढायला लावतो असे सांगून विक्रमा वामन व त्याचे मुलांवर चॅप्टर केस करतो असे सांगितले. तसेच बीट जमादार मस्के यांनी तक्रारदाराकडे केलेल्या लाचेच्या अनुषंगाने तक्रारदार यांनी पोलीस निरीक्षक सुडके यांना मस्के साहेबांनी बोलल्या प्रमाणे त्यांचेकडे करून टाकतो असे म्हटले असता पोलीस निरीक्षक सुडके यांनी मी काही बोललो काय असे म्हणून त्या बाबत बोलण्याचे टाळले.

त्यानंतर दिनांक २४.०५.२०२० रोजी करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक नंदकिशोर उत्तमराव मस्के, पोलीस नाईक, ब.न. ५५९, पोलीस स्टेशन हिंगोली ग्रामीण यांनी लाचेच्या रक्कमेचा पहिला हप्ता म्हणून १०,०००/–रू. तक्रारदार यांचेकडून माळशेलु गावाचे जवळ रोडवर स्विकारली. त्यावरून लोकसेवक नंदकिशोर उत्तमराव मस्के, पोलीस नाईक, ब.नं. ५५९, पोलीस स्टेशन हिंगोली ग्रामीण यांना लाचेच्या रकमेसह ताब्यात घेण्यात आले असून पुढिल कार्यवाही सुरू आहे. ही कामगिरी मा. श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधीक्षिका, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, मा. श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधिक्षिका, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, व श्री हनुमंत गायकवाड, पोलीस उप अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीमती अफुने यांनी पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, स. पो.उप.नि. श्री बुरकुले, पोहेकॉ श्री सुभाष आढाव, पोहेकॉ श्री अभिमन्यु कांदे, पोहेकॉ श्री विजय कुमार उपरे, पोना श्री संतोष दुमाने, पोना श्री ज्ञानेश्वर पंचलिंगे, पोना श्री विनोद देशमुख, पोना श्री तानाजी मुंढे, पोशि श्री अविनाश किर्तनकार, पोशि श्री प्रमोद थोरात, व चापोना श्री हिम्मतराव सरनाईक अॅ.क.ब्युरो कार्यालय हिंगोली यांचे मदतीने केलेली आहे.

Scanned by CamScanner

अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अॅन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल अॅप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**टोल फ्री क्र.–१०६४**, दुरध्वनी क्र.०२४५६–२२३०५५,
**मोबाईल क्रमांक :–** ८८८८१७९९९,८९७७८१८८२५ व ८३९०७६१५०३.

Scanned by CamScanner